# ३५ . ‘ आयुष्यमान .’

लहान असताना एक गोष्ट बालमासिकात वाचली होती . प्रथम गोष्टच सांगतो म्हणजे तुमची उत्सुकता जास्त ताणायला नको .

पृथ्वीची निर्मिती देवानेच केली त्या काळातील ही गोष्ट आहे . देवाने निसर्ग निर्माण केला आणि मग पशुपक्षी, किटक, मासे वगैरे .

देवाने गाढवाला बनविले व सांगितले की तुझे आयुष्यमान ४० वर्षे . तू सर्वांची ओझी वाहशील . मरीमर काम करशील . गाढव म्हणाले आभार . पण देवा मला ४० वर्षांचे आयुष्य कशाला? मला १० वर्षांचे आयुष्य पुरेसे आहे . देव म्हणाले तथास्तु .

देवाने मग कुत्र्याला बनविले व सांगितले की माणसाच्या रक्षणाची जबाबदारी तुझी . (हल्ली भटक्या कुत्र्यांपासून माणसालाच संरक्षण करावे लागते तो भाग वेगळा) तुला ३० वर्षे आयुष्य देतो . कुत्रा म्हणतो आभार . पण देवा मला १५ वर्षे आयुष्य पुरेसे आहे . देव म्हणतो तथास्तु .

देव मग माकडाला बनवितो व सांगतो कि तुला २० वर्षे आयुष्य देतो . तु आयुष्यभर भटकंती कर , मौजमजा कर . माकडाला आनंद होतो . माकड म्हणते मला १० वर्षे आयुष्य पुरे . देव म्हणतो तथास्तु .

शेवटी देव माणसाला बनवितो . माणसाला सांगतो की तु पृथ्वीवरील सर्वात बुद्धिमान प्राणी असशील . पण तुझे आयुष्य फक्त २० वर्षे .माणूस देवाला धन्यवाद देतो . पण त्याच्या तोंडावरील नाराजी लपत नाही . देव विचारतो की तु आनंदी नाहीस का ? माणूस सांगतो तुम्ही मला बुद्धि दिलीत पण आयुष्य मात्र फारच कमी आहे . मला जास्त आयुष्य द्या . देव म्हणतो ठिक आहे . गाढवाची उरलेली ३० वर्षे , कुत्र्याची १५ वर्षे , माकडाची १० वर्षे तुलाच मिळतील .

तेव्हापासून गाढवाचे आयुष्यमान सरासरी १० वर्षे , कुत्र्याचे १५ वर्षे , माकडाचे १० वर्षे व माणसाचे ७५ वर्षे असे झाले .

काय मित्रांनो गोष्ट आवडली का ? लहानपणीची गोष्ट मला जेव्हा आठवली तेव्हा मी या गोष्टीवर विचार करू लागलो .

(मी प्रत्येक गोष्टीवर/बार्बीवर/लेखनावर / दुस-याच्या बोलण्यावर विचार फार करतो अशी माझ्या बायकोची तक्रारच आहे) आणि विचार करता करता एक धक्कादायक वास्तव माझ्यासमोर फेर धरून नाचायला लागले .

≫ माणूस आयुष्यातील पहिली २० वर्षे माणूस म्हणून जगतो . ( ० - २० )

≫ पुढील ३० वर्षे गाढवासारखा राब राब राबतो . ( २० - ५० )

≫ पुढील १५ वर्षे कुटूंबांची काळजी सुरक्षा वाहतो . (५० - ६५ )

≫ म्हातारे झाल्यावर(६५ च्या पुढे) त्याला सांभाळायला कोणी तयार होत नाही . (कारण त्याची उपयुक्तता संपलीली असते) मग १ मुलाकडून दुस-या मुलाकडे , जावयाकडे अशी त्याची उचलबांगडी होती . त्याची अवस्था माकडाप्रमाणे होते . (एका फांदीवरून दुस-या फांदीवर/झाडावर)

हि गोष्ट जेव्हा मी विद्यार्थांना सांगतो तेव्हा सर्व जण हसतात . प्रत्येक जण म्हणतो कि ही तर सत्यपरिस्थितीच आहे . बस .

पण मला मात्र वेगळेच विचार सुचत असतात . (नेहमीप्रमाणेच )

१ . ह्या गोष्टीतील जीवनप्रवास म्हणजे माणसाच्या ४ अवस्था आहेत . बालपण , तारूण्य / गृहस्ताश्रम , वानप्रथाश्रम व संन्यास .

२ . प्रत्येक माणसाची वरील प्रमाणे अवस्था होईल असे नाही परंतु माणसाने ही अवस्था ओढवणार नाही याची काळजी घेतली पाहिजे .

३ . माणूस हा एक असमाधानी प्राणी आहे . त्याला जबर महत्वाकांक्षा आहे .

४ . माणसाला लांब आयुष्यात रस असतो . पण हेच आयुष्य कसे दर्जात्मक होईल हे तो सोईस्करपणे विसरत असतो .

५ . गोष्टीतील सर्व प्राणी प्रत्येक माणसात आपआपले अस्तित्व दाखवितात .

- ब-याच माणसांना गाढवासारखे राब राब राबावे लागते . ३० बर्षीच नाही तर मरेपर्यंत .

- नोकरीत व्यवसायात कुत्र्याचे प्रेम, लॉयल्टी दाखविणे गरजेचे असते. पण त्या प्रमाणात हे होत नाही ही शोकांतिका आहे. अर्थात नियमाला अपवाद असतातच. याच्या उलट कुत्र्याचा लाळ घोटेपणा मात्र प्रकर्षाने जाणवतो.

६. माकड तर पदोपदी डोकावते. कोणत्याही गोष्टीचे आकर्षण फार काळ टिकत नाही. मग लगेच दुस-या गोष्टीचा शोध , माकडाप्रमाणे दुस-याकडे असलेले आपल्याला पाहिजे हा हट्ट. उ.दा. दर ३ वर्षांनी नवीन गाडी घेणे , फ्लॅट बदलणे , नोकरीत स्थिरता न लाभू देणे / कितीही चांगली नोकरी असेल तरी नोकरीच्या कायम शोधात.

७. माणसाने जर का आर्थिक नियोजन व्यवस्थित केले नाही , असेल नसेल ते मुलांसाठी खर्च केले व मुले चांगली निघाली नाहीत तर म्हातारपणी अशी अवस्था ओढवणारच. आठवून पहा काही चित्रपट ज्याच्यात ही समस्या हाताळली आहे.

म्हणूनच म्हणतो की माणसाने सर्व निर्णय डोक्यापासून घेतले पाहिजेत. भावनेला आवर घातला पाहिजे.

**(All decisions should be taken from brain & not from heart)**